## **अध्याय** चौदावा        क्रूरयवन-शासन-सायंदेववरप्रदान

# *विषय :- पूर्वग्रह  दूषित शासक मनपरिवर्तन*

## विचारधन :-

| |
|---|
| 'क्रूरयवन शासन सायंदेववरप्रदान' ह्या १४व्या अध्यायात, सायंदेवाने केलेल्या सेवेमुळे श्रीनृसिंहसरस्वती समाधानी होऊन, सायंदेवास वर देतात. श्रीगुरुदेवांच्या वर सामर्थ्यामुळे, क्रूर यवन शासनाधिकारी सायंदेवास मृत्युदंड देत नाही. नाशिकचा हा यवन अधिकारी सायंदेवाची सन्मानाने पाठवणी करतो, ही घटना श्रीगुरुचरित्रकारांनी चित्रित केलेली आहे. |

## मीमांसा :-

१४व्या शतकात नाशिक हे तीर्थक्षेत्र यवन शासनाधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली होते.

## **अध्याय** चौदावा क्रूरयवन-शासन-सायंदेववरप्रदान

मूळचे कडगंची, कर्नाटक येथील 'सायंदेव साखरे' कुटुंब उदरनिर्वाहासाठी नाशिकला आले. नाशिकक्षेत्री श्रीगुरुदेवांचे परमभक्त झालेले श्रीसायंदेव हे नाशिकच्या क्रूर यवन अधिकाऱ्याकडे चाकरी करीत असत. (श्रीसायंदेव हे श्रीगुरुचरित्रकारांचे खापरपणजोबा होत.)

सायंदेव श्रीगुरुंना सांगतात,

"(नाशिकचा यवन अधिकारी) दर वर्षी ब्राह्मणाचा जीवानिशी वध करतो. याच कारणाकरता (आमचा वध करण्याकरिता) मला आज यवनाने बोलाविलेले आहे."( अध्याय १४, ओवी क्रमांक १४)

"चिंता करु नकोस" असे म्हणून, भीतीप्रद होणार नाही, असे व्यक्त करणारे आपले आश्वासक हात सायंदेवाच्या मस्तकावर ठेवून श्रीगुरुदेव सांगतात,

**अध्याय** चौदावा क्रूरयवन-शासन-सायंदेववरप्रदान

"भय सोडून तू जावेस, क्रूरयवनास भेटावेस. समाधानाने प्रेमभावनेने तो यवन तुला आमच्याकडे परत पाठवेल. ( अध्याय १४, ओवी क्रमांक १७)

जंववरी तूं परतोनि येसी। असों आम्ही भरंवसीं।
तुवां आलिया संतोषीं। जाऊं आम्ही येथोनि॥ १४-१८॥

श्रीगुरुदेवांवरील श्रद्धेने सायंदेव निर्भीडपणे क्रूर यवन शासनाधिकाऱ्याला भेटायला जातो.

निर्भीड सायंदेवास पाहून भडकलेला क्रूर यवन शासनाधिकारी अंतःपुरात निघून जातो.

अध्याय १४, ओवी क्रमांक २९, ३०, ३१ नुसार अंतःपुरात यवन देहभान हरपल्यासारखा झोपला. ह्या गाढ निद्रेतून जागा झाल्यावर, त्याच्या छातीत कळा येत होत्या. त्याला झोपेत निश्चित काय पाहिले ? ते आठवत नव्हते. "एक ब्राह्मण घाईत शस्त्र

मारीत होता, यवनाचे अवयव तोडू पहात होता", असे यवन म्हणत होता.

अंतःपुरात (म्हणजे राणीवसा) इतर कोणत्याही व्यक्तिला प्रवेश नसल्याने, यवनाची अंतःपुरातील ही अवस्था ऐकिव बातमीवरुन श्रीगुरुचरित्रकार सांगतात.

ह्या सर्व घटनाक्रमांवरुन दिसते की,

पूर्वग्रह दूषित मनाने हा यवन अधिकारी आपल्या हातातील निरंकुश सत्तेची परिसीमा गाठत असावा.

(इतिहासात दुसऱ्या महायुद्धकाळात जर्मनीचा सर्वे सर्वा असलेल्या हिटलरनी छळ छावण्या उभारुन, पूर्वग्रह दूषित मनाने ज्यू लोकांवर सूड उगविला होता).

**अध्याय** चौदावा क्रूरयवन-शासन-सायंदेववरप्रदान

सायंदेव ह्या सभ्य निरपराध माणसाचा, मृत्युस सामोरे जाणारा निर्भीडपणा पाहून, यवन शासनाधिकारी अंतर्मुख झाला असावा.

अंतःपुरातून परत आल्यावर यवनाने “तूच माझा स्वामी आहेस” , (अध्याय १४, **ओवी क्रमांक** ३२) असे म्हणून सायंदेवाची सन्मानपूर्वक पाठवणी केली.

सायंदेवाचा सन्मान करुन, दरवर्षी एकेक ब्राह्मणास मृत्युदंड देऊन करीत असलेल्या अन्यायाची दिलगिरी, यवन अधिकाऱ्याने व्यक्त केलेली दिसते.

यवन अधिकाऱ्याचे मन परिवर्तन म्हणजे तत्कालिन नाशिकक्षेत्रावरील अरिष्ट गेले असे म्हणणे संयुक्तिक आहे.

## अध्याय चौदावा क्रूरयवन-शासन-सायंदेववरप्रदान

सायंदेवास श्रीगुरु सांगतात, “आता सर्व अरिष्ट गेलेले आहे. सुखाने जीवन जग. आम्ही तुम्हाला तुमच्या गावाजवळ (कडगंजी,कर्नाटक) १५ वर्षांनी भेटू.”

ह्या घटनेनंतर श्री गुरुदेव नाशिकहून वैजनाथ (परळी, बीड जिल्हा) येथे गेले.

श्रीगुरुचरित्र अध्याय १३ व १४ मध्ये ब्रह्मगिरीपर्वताच्या पायथ्याशी असलेल्या त्रिंबकेश्वर ह्या ज्योर्तीलिंगाचा उल्लेख आढळत नाही. ह्यावरुन नाशिकच्या यवन शासनाधिकाऱ्याच्या क्रौर्याची कल्पना येऊ शकते.

यवन दहशतीमुळे, त्र्यंबकेश्वर तसेच वैजनाथ ह्या दोन्ही ठिकाणी असलेल्या ज्योर्तिलिंगांचा उल्लेख श्रीगुरुचरित्रकारांनी केलेला नसावा, असे वाटते.

## अध्याय चौदावा क्रूरयवन-शासन-सायंदेववरप्रदान

श्रीनृसिंहसरस्वती अवतार काळ इसवी सन १३७८ ते इसवी सन १४५८ होय.

ह्या काळात परधर्मीय यवन आक्रमणाने, ग्लानी आलेल्या हिंदू धर्माच्या प्रतिष्ठापनेचे काम श्रीगुरुदेवांनी केलेले आहे.

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥